आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2023 - Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol. I, Issue- XXIX, Feb. 2023

- Editor in Cheif -
**Dr. Amit Mirji**
Assistant Professor & HOD
Department of Managment
Government First Grade College, Sindagi - 586128.

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

| | | | |
|---|---|---|---|
| 32. | PREFERENCE PATTERN OF INVESTORS IN STOCK MARKET- A CASE STUDY OF INVESTORS IN NORTH KARNATAKA REGION | Dr. Amit Mirji | 180 |
| 33. | E-GOVERNANCE IN KARNATAKA | Neelamma Hattalli | 184 |
| 34. | COMPARATIVE STUDY OF OLD TAX REGIME VS NEW OPTIONAL TAX REGIME AND ITS IMPACT ON INDIVIDUAL TAX PAYER – A SPECIAL REFERENCE TO MUMBAI REGION | Manisha Gupta<br>Baljeet Saw | 191 |
| 35. | अध्यापक महाविदयालयीन अधिव्याख्यातांचा आशयज्ञान अभिवृदधीविषयक दृष्टीकोन एक अभ्यास | सहा प्रा नांगरे नूतन कृष्णराव | 198 |
| 36. | कळमनुरी तालुक्यातील शहिद जवान | प्रा. डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे | 202 |
| 37. | भारतीय राष्ट्रवाद आणि लखनौ करार | सहा. प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील | 207 |
| 38. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : संधी आणि आव्हाने | प्रा. डॉ. डी एन सोनवणे | 212 |
| 39. | भारतीय अर्थव्यवस्थेतील किंमतवाढीची कारणे | प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे | 217 |
| 40. | भारतीय राज्यघटना निर्मितीची प्रकिया | प्रा. गायकवाड पी. सी.<br>प्रा. डी. अनिल शिंगारे | 221 |



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



228

SHIVAJI COLLEGE



# भारतीय अर्थव्यवस्थेतील किंमतवाढीची कारणे

प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली महाराष्ट्र

**गोषवारा-**

भारतीय अर्थव्यवस्थेतील वाढती महागाई हा एक महत्वपूर्ण विषय अलीकडील काळात बनला आहे. वाढत्या वस्तू व सेवांच्या किमतीमुळे सर्वसामान्य व्यक्तींच्या जीवन असह्य झालेला आहे. देशात दोन वर्षांपूर्वी म्हणजे जागतिक महामारी कोविड-19 चा अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर झालेला परिणाम आणि हा परिणाम दूर करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी उचललेले पाऊल या सर्व घटकांचा परिणाम होऊन अर्थव्यवस्थेत महागाईची समस्या निर्माण झाली आहे.

**संज्ञा** - महागाई, किंमत वाढ, वित्तीय चलन, बँक दर, व्याजदर, रेपो रेट, साठा, पुरवठा, मागणी, मंदी, विपरीत परिणाम.

**प्रस्तावना**

किंमत वाढ हा विषय अर्थव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीच्या संबंधित आहे. स्वातंत्र्य काळापासून किंमत वाढ हा विषय महत्त्वाचा विषय ठरलेला आहे. या विषयाचा परिणाम अर्थव्यवस्थेतील प्राथमिक द्वितीय घटकावर होऊन एकूण अर्थव्यवस्थेवर चांगला वाईट परिणाम होत असतो. अतिशय कमी किंमत होणे किंवा अतिशय जास्त किंमत असणे हे दोन्ही घटक लाभदायक नसून त्यातून समतोल विकासाचे उद्दिष्टे पण पूर्ण करू शकत नाही. वाढत्या महागाईचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेमध्ये बेकारी दारिद्र्य आर्थिक विषमता बेरोजगारी विकासाच्या दरात गाठ होणे दरडोई उत्पन्न कमी होणे अशा प्रकारचे मूलभूत प्रश्न निर्माण होत असतात.

वस्तूंची किंमत वाढणे म्हणजे दुसऱ्या बाजूने पैशांचे मूल्य कमी होणे होय. पैशांची मूल्य कमी होणे याचा अर्थ असा आहे की पूर्वी पैशाच्या एका नग संख्येमध्ये जेवढ्या वस्तू खरीप खरेदी करत होतो तेवढ्या वस्तू आज रोजी खरेदी करू शकत नाही त्यापेक्षा कमी वस्तू तेवढ्यात पैशात खरेदी करणे शक्य असते अशा स्थितीला भाववाढ किंवा किंमत वाढ असे म्हणू शकतो. उदाहरणार्थ ऑगस्ट 2020 मध्ये 10 रुपया मध्ये दोन पेन येत होत्या आज रोजी 14 रुपयात दोन पेन येत नाहीत दोन पेन खरेदी करण्यासाठी साधारणपणे 14 रुपये द्यावे लागतात. यालाच सामान्य भाषेत किंमत वाढली असे म्हणतात तर अर्थशास्त्रीय भाषेमध्ये आपण त्याला भाववाढ किंवा पैशाचे मूल्य कमी झाले असे म्हणतात.

भारताच्या स्वातंत्र्य कालखंडापासून आजपर्यंत भाव वाढीची समस्या अर्थव्यवस्थेमध्ये आहे. ती कमी करण्याचा प्रयत्न अविरतपणे केला जात असल्याचा दिसून येतो. अर्थव्यवस्थेतील किंमत वाढ जाहीर करत असताना एक आधार वर्ष गृहीत धरले जाते व त्या वर्षाच्या आधारावर चालू वर्षातील भाव वाढीचे स्पष्टीकरण केले जाते. अगदी सुरुवातीला पहिले आधार वर्ष म्हणून सन 1950-51 हे आधार वर्ष गृहीत धरण्यात आले होते आणि भाव वाढीचा निर्देशांक काढण्यात आला होता. त्यानंतर 1960-61, 1970-71,1981-82,1999-2000,2010-11,अशाप्रकारे आधार वर्ष गृहीत धरून चालू वर्षांमध्ये भाव वाढ निर्देशांक काढला जातो. रुपयाच्या मूल्यांमध्ये होणारे परिवर्तने मोजण्याकरिता निर्देशांक ही संकल्पना विकसित झाली आहे. निर्देशांका च्या मदतीने वस्तूच्या किमती तील बदल आणि पैशांच्या मूल्य परिवर्तन निर्देशांकाच्या मदतीने लक्षात घेतला जातो.

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

### संशोधनाची उद्दिष्टये

1. किंमत वाढ आणि पैशांची मूल्य यांचा सहसंबंध स्पष्ट करणे.
2. भारतातील किंमत वाढीच्या कारणाचा आढावा घेणे.
3. किंमत वाढीचे वास्तविकता स्पष्ट करणे.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत लघु संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विश्लेषण पद्धतीचा वापर केला आहे. संशोधनाची आवश्यक असलेले माहिती संदर्भ, वृत्तपत्रे, मासिके, इलेक्ट्रॉनिक्स मीडिया या साधनांच्या मदतीने उपलब्ध करण्यात आली आहे.

### विषय विवेचन

भारतीय अर्थव्यवस्थेत किंमत वाढीची समस्या आहे स्वातंत्र्यापासून आजपर्यंत आहे. किंमत वाढीचे विश्लेषण करण्यासाठी निर्देशांक या घटकांचा वापर केला जातो. निर्देशांकाच्या मदतीने एका विशिष्ट हजार वर्षांची निवड करून त्यात तुलनेत चालू वर्षात वस्तूच्या किमतीत काय बदल झाला हे लक्षात घेतले जाते. व त्यावरून किमतीतील वाढ-घट याचे विश्लेषण केले जाते.

वस्तूंची किंमत आणि पैशांची मुले यांचा अगदी जवळचा संबंध आहे. वस्तूंच्या किमतीत वाढ होत असताना पैशांचे मूल्य कमी होते या उलट वस्तूंच्या किमतीत घट होत असेल तर अशा स्थितीत पैशांचे मूल्य वाढते. पैशांची मुले कमी होऊ नये यासाठी सरकारकडून सतत प्रयत्न केले जाते आणि किंमत वाढ किंवा भाव वाढ हे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतातील भाववाढीची कारणे

भाववाढीचे अनेक कारणे आहेत त्यामध्ये प्रमुख दोन कारणांचा विशेष उल्लेख केला जातो एक म्हणजे मागणी जन्य कारणे आणि दुसरे म्हणजे पुरवठाजन्य कारणे. वस्तूंची किंमत वाढत असताना वस्तूंचे उत्पादकन वाढते असते. कारण उत्पादकाला मिळणारा नफा हा जास्त असतो. तर वस्तूची किंमत कमी होत असताना वस्तूच्या उत्पादनात मात्र विपरीत परिणाम होतो कारण उत्पादकाच्या होणाऱ्या लाभावर विपरीत परिणाम झालेला असतो. भारतीय अर्थव्यवस्थेतील भाववाढीची/किंमतवाढीची कारणे प्रामुख्याने पुढील प्रमाणे सांगता येतात.

1. चलनपुरवठ्यात होणारी वाढ

भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेले कोविड-19 चे संकट आणि त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राच्या प्रगतीवर लॉकडाऊनच्या कारणामुळे विपरीत परिणाम झाल्याचा दिसून येतो. अनेक उद्योग, कंपन्या ह्या बंद पडले आहे,तर अनेक कंपन्यांनी, उद्योगानी आपले उत्पादन आपले उत्पादन कमी करून कामगारांच्या संख्येमध्ये घट केली आहे. याचा एकंदरीत परिणाम अर्थव्यवस्थेमध्ये मंदीची स्थिती निर्माण होण्यावर झाला. या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने आर.बी.आय.च्या मदतीने रेपो दर, बँकदर, व्याजदर कमी करून अर्थव्यवस्थेत चलन संकेत वाढ करण्याचा प्रयत्न केला की,ज्यामुळे लोकांच्या हातात पैसा दिल्यामुळे ते खर्च करतील आणि वस्तू सेवांना मागणी निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली मंदीची स्थिती उद्योग, सेवा क्षेत्रावर निर्माण झालेले संकट दूर होणे ही अपेक्षा त्या पाठीमागची होती. 'फेब्रुवारी 2021 मध्ये 6.25% असणारा रेपो दर ऑक्टोबर 19 मध्ये 5.15% मार्च 20 मध्ये 4.40% मे 20 मध्ये 4% इतपर्यंत कमी केला आणि तो एप्रिल 22 पर्यंत 4%टक्केच कायम ठेवला'. याचा परिणाम अर्थव्यवस्थेत चलनाची संख्या वाढून वस्तू सेवांची मागणी वाढून किमतीमध्ये वाढ



Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

230

COLLEGE



झाली.

2. उद्योगक्षेत्र उत्पादनाची अवस्था समाधानकारक स्थिती.

अर्थव्यवस्थेत कोविड 19 जागतिक महामारीमुळे उद्योगक्षेत्रावर मोठे संकट निर्माण झाले आहे. लॉकडाऊन च्या कालखंडामध्ये उद्योगांचे उत्पादन बंद झाले. परिणामी बाजारपेठेत वस्तूंची हवा कमी झाली व एकूण पुरवठा कमी झाला. त्या तुलनेत मानवी गरजा व उद्योग वस्तूला असलेले मागणी मात्र कमी झाली नाही आणि याचा परिणाम बाजारपेठेत पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त झाली आणि वस्तूच्या किंमत वाढीला चालना मिळाली. 'औद्योगिक उत्पादन वाढीचा दर हा केवळ 2019-20 मध्ये 5.6% होता'[2]. औद्योगिक क्षेत्राची प्रगती आणि उत्पादकता समाधानकारक असल्यामुळे वस्तूच्या किमतीत वाढ झाली.

3. पेट्रोलियम व इतर ऊर्जा निर्मिती साधनांच्या किमतीत वाढ

पेट्रोलियम व ऊर्जा निर्मिती साधनाच्या किंमतीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली. 'भारताची राजधानी दिल्लीमध्ये फेब्रुवारी 2023 मध्ये पेट्रोल 96.72 रुपये आहे. ह्या पेट्रोलच्या किंमती फेब्रुवारी 19 मध्ये 70.94 होत्या फेब्रुवारी 20 मध्ये 74.19 रुपये फेब्रुवारी 21 मध्ये 86.30 रुपये तर फेब्रुवारी 22 मध्ये 95.41 रुपये'[3] होत्या यामुळे वाहतूक क्षेत्र संपूर्ण पेट्रोल डिझेलच्या किमतीवर अवलंबून असल्यामुळे एकूण वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे. तर गॅसच्या किमतीमध्ये वाढ झाली ती पुढील प्रमाणे 'डिसेंबर 19 मध्ये गॅसची किंमत मुंबई शहरात 665 रुपये त्यामध्ये वाढ होऊन डिसेंबर 20 मध्ये 694 रुपये झाले तर मी 22 मध्ये 999.50 रुपये आणि फेब्रुवारी 23 मध्ये1030.46रु. आहे.'[4] पेट्रोल,डिझेल,गॅस अशा प्रकारची साधने जीवन आवश्यक साधने बनले आहेत. त्यामुळे त्यांच्या मागणीमध्ये घट न होता वाढ होत गेली आहे. तिचा परिणाम वाहतूक वस्तू निर्माण उद्योग यासारख्या घटकांचा खर्च वाढून वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ झाली.

4. उपभोक्ते आणि उत्पादक यांचे अंदाज

उपभोक्ते आणि उत्पादक यांचा भविष्यकालीन वस्तूच्या किमतीतील चढउताराचा अंदाज हाही किंमत वाढीस परिणाम घडून आणू शकतो. सामान्यपणे उत्पादक असे विचार करतात की भविष्यात किंमत वाढू शकते आणि त्यामुळे वास्तव स्थितीत वस्तू न विकता भविष्यासाठी तो साठा करून ठेवावा भविष्यात मिळणारी किंमत जास्त आहे नफा जास्त मिळतो या हेतूने बाजारातील पुरवठा कमी होतो आणि वस्तूंचे किंमती वाढतात.

याउलट उपभोक्त्यांच्याही भविष्यकालीन अंदाज असा असतो की, भविष्यात वस्तूच्या किमती वाढू शकतात आणि आजच वस्तूंची खरेदी करावी या अंदाजामुळे वस्तूची बाजारपेठेतील एकूण मागणी वाढते परिणामी वस्तूंचे किंमती वाढतात.

या प्रमुख कारणामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेत वस्तूच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

## निष्कर्ष

१) वस्तूंच्या किंमती ह्या सरकारच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या ऊर्जा निर्मिती साधनाच्या किंमती वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेत किंमत वाढ झाली आहे.

२) अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी चलनसंख्येमध्ये वाढ करण्यात आले याचा परिणाम किंमत वाढ झालेली आहे.

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Ta.& Dist.Hingoli.(M.S.)

SHIVAJI COLLEGE HINGOLI



३) कोविडच्या काळामध्ये अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्रावर मंदीची अवस्था निर्माण झाली ती पूर्णपणे नष्ट झालेले नाही याचा परिणाम उत्पादन कमी होऊन बाजारपेठेत वस्तूंचा पुरवठा कमी झालेला आहे परिणामी किमतीत वाढ झाली आहे.

४) व्यापारी उद्योजक भविष्यात तिला अंदाज लक्षात घेऊन बाजारपेठेतील कृत्रिम वस्तूंचा साठा कमी करतात यामुळे वस्तूंची मागणी जास्त आणि पुरवठा कमी होऊन किंमत वाढ झालेली आहे.

अशा एक प्रकारची प्रमुख निष्कर्ष प्रस्तुत लघुशोध निबंधाची सांगता येतात.

## सारांश

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जी महागाई वाढलेली आहे दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर किंमत वाढ झालेली आहे ही प्रामुख्याने कोविड-19 या जागतिक महामारीचा परिणाम आणि सरकारने कोविड-19 ची मंदीची अवस्था दूर करून देशाचा विकास साध्य करण्यासाठी केलेली प्रचंड प्रमाणातील चलनाच्या संख्येतील वाढ हे प्रमुख कारणे अर्थव्यवस्थेतील किंमत वाढीचे दिसून येतात. लॉकडाऊन किंवा कोविडचा असर संपूनही दोन वर्षे पूर्ण होत असतानाही अर्थव्यवस्थेच्या महागाईची स्थिती कमी झालेली नाही हे वास्तव आहे. महागाई कमी करण्यासाठी सरकारकडून विशेष असे प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

## संदर्भसूची


1. https://pib.gov.in.
2. https://industries.ch.gov.in
3. https://www.petrol diesel price.com
4. https://iocl.com
5. आर्थिक सर्वेक्षण 2018-19, 2019-20,2020-21,2021-22
6. दत्त सुंदरम,भारतीय अर्थव्यवस्था
7. देसाई भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था
8. विकोपीडिया, युट्युब,
9. दै.लोकसत्ता, दै.महाराष्ट्र टाइम्स,
10. अर्थसंवाद, योजना.


Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)